स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 09–07–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 6. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 7. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 9. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 10. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 11. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 12. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 13. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 14. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 15. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 16. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त (1)
2. सौ. रंजना लाडे, निगम सचिव तथा उपायुक्त (7)

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 159:– {स्लम विभाग} नागपूर शहरात "पैसे द्या व वापरा" या तत्वावर सुलभ शौचालयाचे बांधकाम करणे व त्याचे दिर्घ काळाकरिता संचालन, देखभाल व सुस्थिती राखण्याचा कामाच्या करारनाम्यास स्थायी समिती, ठराव क्र. 80, दि. 01.06.2015 नुसार मंजुरी प्राप्त झालेली आहे. या करारनाम्यातील अट क्र. 23 व 38 मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. मंजुर करारनाम्यानुसार Clause No. 23 - Demand of excess user charges or levy of charges other than the tariff shall not be permitted and complaint to this effect from the member of the public, shall be liable for penalty or termination of the contract. Repeatative complaints shall invite termination of the contract, without prior intimation.

- प्रस्तावित सुधारित Clause No. 23 - Demand of excess user charges or levy of charges other than the tariff shall not be permitted and complaint to this effect from the member of the public, the First Party shall inform the Second Party by giving atleast one month's show cause notice. And if submission of explaination by Second Party is not

satisfactory then second party shall be liable for penalty or termination of the contract. Repeatative complaints shall invite termination of the contract, without prior intimation.

2. मंजुर करारनाम्यानुसार Clause No. 38 - Violation of any terms and conditions stipulated in the agreement shall invite cancellation/termination of the contract and may not be entertained next time.

- प्रस्तावित सुधारित Clause No. 38 - Violation of any terms and conditions stipulated in the agreement shall invite cancellation/termination of the contract with due intimation by giving at least one month's show cause notice. And then, may not be entertained, next time.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 160</u>:— {जनसंपर्क विभाग} नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या निविदा सूचना, जाहीर सूचना, दर्शनी जाहिराती व अन्य जाहिराती तयार करून वर्तमानपत्र, रेडीओ, टि.व्ही.इ. (प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीया) प्रसार माध्यमांमार्फत प्रसारित करण्याकरीता म.न.पा.पॅनेलवर एजन्सी नियुक्त करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदा धारकामधून मेसर्स व्हेन्चर्स ॲडव्हरटायझिंग प्रा.लि.यांची स्थायी समिती ठराव क्र.८३ दि. १०.०५.२०१८ नुसार नियुक्त करण्यास मंजूरी दिल्यानंतर त्यांनी मंजूर निविदा दरावर काम करण्यास असमर्थता व्यक्त केल्यामुळे त्यांनी निविदेसोबत भरलेली किमान सुरक्षा ठेव (E.M.D.) जप्त करून व त्यांची केलेली नियुक्ती रद्द करून नव्याने निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

२. तसेच म.न.पा.च्या जाहिरातीची कामे खोळंबू नये व कार्यालयीन कामात अडचणी येऊ नये म्हणून यापूर्वी मागविण्यात आलेल्या निविदामधून दुसऱ्या क्रमांकावरील अनु.क्र.२ व ३ चे निविदाकार (H-2) अनुक्रमे मे.अमित ॲडव्हरटायझिंग एजन्सी व मे. प्रॉफीट ॲडव्हरटायझर्स (इं.) प्रा.लि. नागपूर यांनी नमूद केलेला दर (प्रत्येक जाहिरातीवर 8% सुट) विचारात घेवून पुढील सहा महिन्याकरीता जाहिरात एजन्सीचे पॅनलवर नियुक्त करून जाहिरातीची कामे समप्रमाणात देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन दोन महिन्याचा कालावधी मंजूर करण्यात येतो. या काळात तातडीने नवीन निविदा काढण्याची कार्यवाई विभागाने पूर्ण करावी. उपरोक्त काम सम प्रमाणात विभागुन द्यावे. या सुचनेस समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 161</u>:— {विद्युत विभाग} नागपूर महानगरपालिका सिव्हिल लाईन्स येथील मुख्यालयातील जुने सबस्टेशन नविन सबस्टेशनच्या इमारतीमध्ये स्थानांतरीत करून क्षमता वाढविणे व मुख्यालयातील इमारतीमधील विद्युत पुरवठाच्या कामांचे नुतनीकरण करण्याच्या प्रस्तावित कामाच्या रू. 1,74,88,950/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 162</u>:— {विद्युत विभाग} लक्ष्मीनगर झोन क. 01, प्रभाग क. 16 मध्ये विविध ठिकाणी (लक्ष्मीनगर, सुरेंद्र नगर, देवनगर, विवेकानंद नगर, छत्रपती नगर, नागभूमी, बजाजनगर इ.) प्रकाश व्यवस्था करण्याकरीता प्राकलनीय राशीपेक्षा 1.2% ने कमी असलेली रू. 63,68,142/— ची निम्नतम दराची मेें. साधना इलेक्ट्रिक वर्क्स, नागपूर यांच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 163</u>:— {विद्युत विभाग} नागपूर महानगरपालिकेच्या केंद्रीय कार्यालयाकरिता जनरेटरचा पुरवठा करुन उभारणी करण्याच्या प्रस्तावित कामाच्या

रु. 81,66,224/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 164:–** {बाजार विभाग} धरमपेठ झोन क्र. 2 अंतर्गत नेताजी मार्केट परिसरामधील फुल मार्केटयेथील ओटा क्र. डी–4/4 हा ओटा श्री. नितीन केशवरावजी वानखेडे यांना परवान्यावर देण्यात आला आहे. याच ओटयाच्या मागील ओटा क्र. डी/24 रिकामा असुन या ओटयाच्या मागणीकरीता श्री. नितीन केशवरावजी वानखेडे यांनी अर्ज सादर केला आहे.

उक्त ओटयाचे अद्यापपावेतो आवंटन न झाल्याने त्यापासुन म.न.पा.स कुठलेही आर्थीक उत्पन्न प्राप्त होत नाही. अर्जदार श्री. नितीन केशवरावजी वानखेडे यांना या ओटयाचे आवंटन केल्यास म.न.पा.स सिध्द शिघ्र गणकाचे दरानुसार ओटयाचे मुल्य तसेच प्रतिमाह परवाना शुल्क प्राप्त होवु शकेल.

महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमाचे कलम 332 (ब) अन्वये आयुक्तांना स्थायी समितीच्या मान्यतेने महानगरपालिका बाजारातील, कत्तलखान्यातील किंवा पशु–आवारातील कोणत्याही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा, छपरी किंवा कोंडवाडा किंवा अन्य इमारत यावर आकारणी योग्य असलेले दुकान भाडे, भाडे आणि फि किंवा त्याचा कोणताही भाग एकावेळी एकापेक्षा अधिक होणार नाही अशा कोणत्याही कालावधीसाठी मक्त्याने देण्याची तरतुद असुन, कलम 332 (क) अन्वये योग्य वाटेल अशा मुदतीसाठी आणि अशा शर्तीवर जाहीर लिलावाने देण्याचे किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने अशा विशेषाधिकाराचा खाजगीरीत्या विक्री करून विनियोग करण्याची तरतुद आहे.

ओटा क्र. डी/24 चे क्षेत्रफळ 6.32 चौ.मी. (68 चौ.फुट) असुन सिध्द शिघ्र गणकाचे दरानुसार त्याचे मुल्य रू. 3,32,344/– निश्चित करण्यात आले आहे. तसेच मासिक परवाना शुल्क रू. 2,282/– निश्चित करण्यात आले आहे.

वरील कलमाला अनुसरून वर निश्चित केलेले ओटयाचे मुल्य व प्रतिमाह परवाना शुल्कावर नेताजी मार्केट परिसरातील फुल ओटा क्र. डी/24 श्री. नितीन केशवरावजी वानखेडे यांना 11 महिन्याच्या अस्थायी परवान्यावर आवंटीत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयातील जागा म.न.पा. च्या प्रकल्पात समाविष्ट असल्यामुळे जागा आवंटीत करण्यास एकमताने नामंजुरी प्रदान करण्यात येते तसेच यानंतर नेताजी मार्केट मधील कुठलेही नवीन प्रस्तावास मंजुरी देण्यात येऊ नये अशी ही स्थायी समिती विभागास निर्देश देते.

**ठराव क्रमांक 165:–** {प्रकल्प विभाग} प्रभाग क्र. १७, न्यु एस.टी. स्टॅन्ड ते राहुल हॉटेल मागे (शेतकरी भवन मागील माग) सिमेंट रस्त्याचे बांधकाम करणे रूपये १२७४४१०५/– चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, आर. एस. नायडु यांची प्राकलनिय दरापेक्षा ११.३० टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ११३०४०२१/– ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 166:–** {पेंच प्रकल्प कक्ष} जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत पेंच टप्पा –४ वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गत समाविष्ठ भाग ३ मध्ये एकूण २४ जलकुंभाना पाणी पुरवठा करण्याकरीता फीडरमेंन्स टाकण्याचे कामे प्रस्तावित होते.

वरील एकूण २४ जलकुंभापैकी एकूण २० जलकुंभांची फीडर मेन्सचे कामे पूर्ण झालेली असून दि. २८ मार्च २०१५ पासून नियमित पाणी पुरवठा सुरु आहे. तथापी उर्वरीत चार जलकुंभांची कामे विविध कारणास्तव सुरु न करता आल्यामुळे फीडरमेंन्सचे कामे थांबविण्यात आले होते. उर्वरीत जल कुंभाची जागा निश्चित झाल्यावर मनपा फंडातून निविदा काढून कामाची सुरुवात करण्यात आली व या जलकुंभाना जोडणारी फीडरमेंन्सचे कामे पुन: सुरु करण्यात आले. फीडरमेंन्स टाकण्याकरीता मुळ कार्यादेश राशी रु. ४८.६८ कोटी

आहे. तसेच ठराव क्र. १११ दि. १४.०८.२०१४ अन्वये प्रथम सुधारीत राशी रु. ५८.२४ कोटी मंजूर करण्यात आली आहे. उर्वरीत जलकुंभाची जागा निश्चित झाल्यानंतर कामाच्या व्याप्तीत वाढ झाल्यामुळे द्वितीय सुधारीत राशी रु. ६२.७६ कोटी मंजूर करण्याचे प्रश्न उचित निर्णयास्तव विचारात घेऊन वाढीव फीडर मेन्सचे कामे पूर्ण करण्यास्तव (रु.६२.७६–५८.२४) म्हणजे रु. ४.५२ कोटी चे अतिरिक्त खर्चास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 167:–</u> {जलप्रदाय विभाग} नागपूर शहराकरिता 24X7 अखंडीत पाणी पुरवठा योजना राबविण्याचे प्रकल्पाकरिता स्थायी समिती ठराव क्र. 71 दि. 30.07. 2008 अन्वये M/s DRA Consultants Pvt. Ltd. यांना प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार म्हणुन खालील तक्त्यात नमुद दरांवर नेमण्यास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

| Sr. No | | Description of Work | Base Cost In Rs.Lacs | Fees in % of base cost of each Phase |
|---|---|---|---|---|
| 1 | **Phase I** | Preparation of DPR as per JnNURM Toolkit | Estimate cost of DPR | 00.75% |
| 2 | **Phase II** | Preparation of BID Document | Estimate cost of DPR | 00.50% |
| 3 | **Phase III** | Project Management Consultancy | | |
| | **i.** | Stage-I Dharampeth Pilot Zone | Capital Expenditure | 02.00% |
| | **ii.** | Stage-II Entire City of Nagpur | Capital Expenditure | 02.00% |

उपरोक्त निर्धारित शुल्कानुसार मे. डी.आर.ए. कंन्सलटंट प्रा. लि. नागपूर यांना पत्र क्र. WW/EE/01/2008/JnNURM dtd. 05.08.2008 अन्वये नागपूर शहरासाठी 24X7 अखंडीत पाणी पुरवठा योजना राबविण्या करिता प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागाराचे (PMC) कामाकरिता कार्यादेश देण्यात आले. सदर कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर PMC ने सदर प्रकल्पा करीता रु. 34980 लक्ष रक्कमेचा (DPR) सादर केला होता. सदर डी.पी.आर. सादर करते वेळी नागपूर शहरात धरमपेठ झोन अंतर्गत Pilot Project चे कामाकरिता मे. व्हिवोलिया या कंपनीला कार्यादेश देण्यात आलेले होते. परंतु 24X7 अखंडीत पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु झाल्याने सदर रु. 1800.00 लक्ष कामाचा समावेश Phase III अंतर्गत या प्रकल्पात करण्यात आला. या संपुर्ण प्रकल्पाकरिता प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागाराचे (PMC) शुल्का करिता (Fees) रु. 1172.85 लक्ष चे खर्चास स्थायी समिती ठराव क्र. 254 दि. 18.11.2008 अन्वये खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे मंजुरी प्रदान करण्यात आली होती.

<u>तक्ता क्र.:– 1</u>

| Sr. No | | Description of Work | Base Cost Rs. in Lacs | Fees in % of base cost of each Phase | Expenditure Rs. In lacs |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **Phase I** | Preparation of DPR as per JnNURM Toolkit | Estimate cost of DPR Rs. 34980 | 00.75% | 262.35 |
| **2** | **Phase II** | Preparation of BID Document | Estimate cost of DPR Rs. 34980 | 00.50% | 174.90 |
| **3** | **Phase III** | Project Management Consultancy | | | |
| | **i.** | Stage-I Dharampeth Pilot Zone | Capital Expenditure Rs. 1800 | 02.00% | 36.00 |
| | **ii.** | Stage-II Entire City of Nagpur | Capital Expenditure Rs. 34980 | 02.00% | 699.60 |
| | | | **Total fees in Rs. Lacs** | | **1172.85** |

सल्लागाराचे नियुक्तीच्या कामा करिता उपरोक्त तक्त्यात नमुद अनु क्र. 3 वरील Phase III, Stage-I व Stage-II करिता सल्लागारास प्रदान करावयाचे शुल्क हे निविदा अटी व शर्तीनुसार Time Related व Progress Related अश्या दोन भागात विभागलेले असुन Progress Related कामा करिता देण्यात येणारे शुल्क हे निश्चित आहे. परंतु Time Related कामा करिता सल्लागारास प्रदान करावयाचे शुल्क हे या कामाकरिता निर्धारित कालावधीत पुर्ण न झाल्यास वाढीव कालावधी करिता किती दराने भुगतान करावयाचे याचा उल्लेख सुध्दा निविदेत अंतर्भुत आहे.

नागपूर शहरासाठी 24X7 अखंडीत पाणी पुरवठा योजनेची किंमत जरी JnNURM अंतर्गत प्रकल्प सादर करते वेळी 34980.00 लक्ष दर्शविण्यात आलेली असली तरी सल्लागाराने विस्तृत डी.पी.आर. तयार केल्या नंतर या प्रकल्पाची किंमत CPHEEO मार्फत तपासणीनंतर रू. 38786.00 लक्ष एवढी झाली व या किंमतीस केंद्रशासनाचे जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजुरी प्राप्त झाली. या वाढीव किंमतीमुळे या प्रकल्पा अंतर्गत सल्लागारास प्रदान करावयाचे एकुण शुल्क स्थायी समिती ठराव क्र. 71 दि.30.07.2008 अन्वये मंजुर दरांनुसार खालील तक्ता क्र. 2 नुसार होत आहे.

तक्ता क्र. 2

| Sr. No | Description of Work | | Base Cost Rs. in Lacs | | Fees in % of base cost of each Phase | Fees to be paid Rs. In Lacs |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **Phase I** | Preparation of DPR | At DPR Cost of Rs. 38786.00 | | 00.75% | 290.89 |
| **2** | **Phase II** | Preparation of BID Document | At DPR Cost of Rs. 38786.00 | | 00.50% | 193.93 |
| **3** | **Phase III** | Project Management Consultancy | | | | |
| | **i.** | Stage-I Dharampeth Pilot Zone | Capital Rs2040-00 | Expenditure | 02.00% | 40.80 |
| | **ii.** | Stage-II Entire City of Nagpur | Capital Rs38786 | Expenditure | 02.00% | 757.72 |
| | | **Total Fees after revision of DPR** | | **Rs.** | | **1301.34Lacs** |

वाढीव प्रकल्पीय किंमतीमुळे मुळ मंजूरी प्राप्त खर्चात एकुण (रू. 1301.34 – रू. 1172.85 ) = रू.128.49 लक्ष ची वाढ होत आहे.

नागपूर शहरासाठी 24X7 अखंडीत पाणी पुरवठा योजना पुर्णत्वास नेण्याच्या कालावधी हा सदर काम सुरु झाल्या पासुन 5 वर्ष निश्चित करण्यात आलेला होता. परंतु सदर काम या कालावधीत विविध कारणामुळे पुर्ण होऊ शकले नाही तसेच ऑपरेटर मे. ओ.सी.डब्लु. पी.एल. यांनी हे काम पुर्ण करणे करिता मुदत वाढ देण्याची मागणी केलेली आहे. त्यामुळे सदर प्रकल्प पुर्णत्वास येईस्तोवर या प्रकल्पा करिता नेमणुक करण्यात आलेल्या सल्लागाराच्या कंत्राटास सुध्दा मुदतवाढ देणे अपरिहार्य आहे. त्यामुळे सदर प्रस्तावास सल्लागाराला 31 मार्च 2019 पावेतो प्रथमतः मुदतवाढ देणे प्रस्तावित आहे. मुदतवाढ दिल्यामुळे फेज–III अंतर्गत प्रदान करावयाचे शुल्कामध्ये निविदेतील अटी व शर्तीनुसार वाढ होत असून सल्लागारास प्रदान करावयाचे एकुण शुल्क स्थायी समिती ठराव क्र.254 दि.18.11.2008 नुसार मंजुर रू. 1172.85 लक्ष ऐवजी तक्ता क्र. 3 नुसार रू. 1661.83 लक्ष एवढे होत आहे.

<u>तक्ता क्र.3</u>

STATEMENT SHOWING REVISED EXPENDITURE REQUIRED FOR PMC FEES FOR THE ACTUAL WORK OF PMC FOR 24X7 W/S IN PILOT ZONE AND NAGPUR CITY.

| Sr. No. | | PARTICULARS | As per revised DPR cost of Entire city<br>Rs. 38786.00 lacs. & Pilot Project 2039.24 lacs + Additional Fees for Extended Period of both the work in Rs lacs | As per Original DPR cost of Entire city<br>Rs. 34980 lacs & Pilot Project 1800 lacs in Rs lacs | Required Amount of Additional Work Order in lacs |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 | 4 | 5 (3 - 4) |
| 1 | Phase-I | Preparation of DPR for 24x7 in Nagpur City = DPR Cost * 0.75% | 290.8950 | 262.3500 | 28.5450 |
| 2 | Phase-II | Preparation of Bid Document for 24x7 in Nagpur City = DRR Cost * 0.50% | 193.9300 | 174.9000 | 19.0300 |
| 3 | Phase – III | Project Management Consultancy | | | |
| | i | Stage- I Dharampeth Pilot Zone(Total Progress related + Time related) = DPR Cost * 2.00% | 40.8000 | 36.0000 | 4.8000 |
| | ii | Phase – III Stage- II 24x7 Nagpur City(Total Progress related + Time related) = DPR Cost * | 775.7200 | 699.6000 | 76.1200 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2.00% | | | |
| | iii | Stage-I Pilot project ( Time related) montly rate as per formula = (Project Cost * 2% * 40%) / 18 months<br>i.e. = '20,39,24,188 X 2% = Rs. 40,78,484/- / 18 =<br>Rs. 90,633/-<br>(For 24 months) | 21.7519 | 0000 | 21.7519 |
| | iv | Stage-II 24 x 7 (Time related) montly rate as per formula = (Project Cost * 2% * 40%) / 60 months<br>i.e. = Rs. 387,86,00,000 X 2%*40% = Rs. 7,75,72,000/- / 60 = Rs. 5,17,147/-<br>(For 06 months) | 31.0288 | 0000 | 31.0288 |
| | v | Stage-II 24 x 7 Capex (Time related)<br>Additional 34 months after 66 months wef 01.12.15 to 31.05.16..... montly rate as per formula = (Project Cost * 2% * 70%) / 60 months i.e. = Rs. 387,86,00,000 X 2% *70%= Rs. 54300400 / 60 = Rs. 905007.00(For 34 months) | 307.7024 | 0000 | 307.7024 |
| | | **Total Expenditure in Lacs** | 1661.8281 | 1172.8500 | 488.9781 |
| | | **Say Total Expenditure in Lacs** | 1661.83 | 1172.85 | 488.98 |

सबब स्थायी समिती चे मंजुरीनंतर सल्लागार मे.डी.आर.ए. कन्सलटंट प्रा.लि. यांना रू (1661.83 – 1172.85) = रू.488.98 लक्ष रकमेचा अतिरिक्त कार्यादेश द्यावा लागेल व प्रथम टप्प्यात दि. 31.03.2019 पर्यंत मुद्तवाढ द्यावी लागेल.

सबब मे.डी.आर.ए.कन्सलटंट प्रा.लि. यांना प्रथम टप्प्यात दि. 31.03.2019 पर्यंत मुदत वाढ देण्याचा तसेच रू (1661.83 – 1172.85) = रू.488.98 लक्ष रकमेचा अतिरिक्त कार्यादेश देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नागपूर शहराकरिता 24 X 7 अखंडीत पाणी पुरवठा योजनेकरिता नेमणुक करण्यात आलेल्या व्यवस्थापकिय सल्लागाराचे कामास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर कामास दिनांक 31 मार्च, 2019 पर्यंत मुदतवाढ व त्याकरिता लागणाऱ्या रु. 4.89 कोटी च्या खर्चास मंजुरी खालील अटीवर प्रदान करण्यात येत आहे.

1. सल्लागाराने विभागाद्वारे वेळो–वेळी मागणी केलेल्या तांत्रीक बाबींची पुर्तता यथाशिघ्र करावी लागेल. सदर प्रमाणे पुर्तता न केल्यास सल्लागाराकडून त्यांना देय असलेल्या सेवाशुल्काच्या 2 टक्के ते 10 टक्के पर्यंत दंड त्यांच्या सेवाशुल्कातून वसूल करण्यात येईल.
2. निविदेअंतर्गत कलम क्र. 12 (vi) नुसार ऑपरेटर मे. ओ.सी.डब्ल्यु.पि.एल. यांना सदर प्रकल्प पूर्णकरण्यास्तव निर्धारीत केलेल्या कालावधीत मे.ओ.सी.डब्ल्यु.पि.एल. कडून हे काम पूर्ण करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी सल्लागाराची आहे. सदर प्रमाणे कार्यवाही न झाल्यास चे Clause No. (vi) चे अनुषंगाने विभागाद्वारे सल्लागारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
3. सल्लागाराने निविदेतील अंतर्भुत केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास सल्लागारावर निविदेत कलम क्र. 12 (ix) नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
4. 24 X 7 पाणी पुरवठा योजनेच्या निविदेतील कलम 14.2 (vii) नुसार कार्यवाही करीता ऑपरेटर मे. ओ.सी.डब्ल्यु.पि.एल. द्वारे वारंवार आक्षेप नोंदविण्यात येतात. सदर बाबत सल्लागाराकडून आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा म.न.पा. द्वारे सल्लागारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
5. उपरोक्त व्यतिरिक्त म.न.पा. ला सदर प्रकल्पाशी संबंधीत इतर बाबतील आवश्यक ते सहकार्य करावे लागेल.

वरील सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 168:–</u> {स्थावर विभाग} मौजा लेंड्रा, नगर भुमापन क्र. 887 रामदासपेठ मधील रामदासपेठ मराठी प्राथमिक शाळेची तळमजला व प्रथम मजला असलेली व बांधीव क्षेत्र 358.03 चौ.मी. असलेली बंद इमारत व परिसरातील उपलब्ध

असलेली 680.59 चौ.मी. जागा वसतीगृह वापराकरिता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (सी) व (डी) मधील तरतुदीनुसार खालील अटी व शर्थीवर निर्धारित रु. 2,86,202/— प्रति महिना नुसार प्रथम 11 महिन्यांचे कालावधीकरिता मैत्री परिवार संस्था, नागपूर यांना भाडेतत्वावर देण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

अटी व शर्थी :—

1. विषयांकीत इमारतीची संयुक्त पाहणी स्थावर विभाग, शिक्षण विभाग व संबंधित संस्था यांचे प्रतिनिधी यांनी ताबा देण्याचे पूर्वी/ताबा परत घेण्याचे पूर्वी करुन, सविस्तर अहवाल तयार करणे.
2. सदर संस्थेला 11 महिन्यांचे एकूण भाडे आगावू भरणे बंधनकारक राहील.
3. सदरील संस्थेस इमारत देखभाल/दुरुस्तीसाठी रु. 20,000/— सुरक्षा ठेव महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल.
4. इमारत परत करण्यापूर्वी सदर संस्थेनी संयुक्त पाहणी अहवालाप्रमाणे किमान आहे त्या स्थितीत महानगरपालिकेस परत करतील याबाबत सदर संस्थेने हमीपत्र देणे बंधनकारक राहील.
5. इमारत महानगरपालिकेस परत करते वेळी ज्या स्थितीत भाडयावर घेतलेली होती. त्या स्थितीत असल्यास सुरक्षा ठेव परत केली जाईल. अन्यथा आवश्यकतेनुसार सुरक्षा ठेव मध्ये कपात केली जाईल.
6. सदर जागेचा व इमारतीचा उपयोग फक्त वसतीगृह वापराकरिताच करण्यात येईल.
7. महानगरपालिकेला सदर जागा/इमारतीची आवश्यकता असल्यास त्या स्थितीत 30 दिवसांचे पूर्व सुचनेवर जागा/इमारत परत घेण्यात येईल.
8. इमारतीच्या बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरबदल करता येणार नाही.
9. सदर जागेची व इमारतीची देखभाल व दुरुस्ती तसेच विद्युत, पाणी याबाबतची जबाबबदारी संस्थेची राहील.
10. उपरोक्तबाबत कोणत्याही निर्णया संबंधिचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त यांचेकडे सुरक्षित राहील व संस्थेस बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयाच्या अनुषंगाने प्र.क्र. 15 च्या मा. नगरसेवक यांचे आक्षेप अर्ज प्राप्त झाले आहे. विभागाने रामदासपेठ नागरिक मंडळाचा अर्ज यापुर्वी दिला आहे का याची संपूर्ण शहानिशा करावी या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 169:—** केंद्र शासनाचे ''अमृत'' अभियानांतर्गत नागपूर शहरातील **{जलप्रदाय विभाग}** अनधिकृत/ अधिकृत/ स्लम वस्त्यामधे पाणी पुरवठा प्रणालीचे उन्नतीकरण बळकटीकरण करण्याच्या कामास शासनाद्वारे प्रथम रू. 226.69 कोटी रकमेचे विस्तुत प्रकल्प अहवालास दि. 28.10.2016 रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. व सुधारीत रू. 227.79 कोटी रक्कमेचे अहवालास दि. 19.04.2017 रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. या प्रकल्पाकरीता चारदा एकत्रीतपणे व दोनदा 6 पॅकेजमधे निविदा बोलविल्या असता फार अधिकच्या निविदा प्राप्त झाल्या. शेवटच्या वेळेस प्राप्त निविदा 22.14% ने (म्हणजेच रू. 278.21 कोटी) अधिक दरांच्या होत्या. दरम्यान मा. मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि. 30.01.2018 रोजी झालेल्या बैठकीत त्यांनी ''नागपूरची अमृत योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने पूर्ण ठेव तत्वावर राबवावी व त्यासाठी महानगरपालिका नागपूर व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरम्यान MOU करण्याचे'' निर्देश दिले. या दरम्यान भारत सरकारचा उपक्रम असलेली वाप्कोस लिमिटेड कंपनीनेसुध्दा या प्रकल्पाचे काम करण्याकरीता प्रथम प्रकल्पीय किंमतीवर (रू.226.69 कोटी) 22% अधिक व त्यावर त्यांचे एजंसी चार्जेस 8% असा एकुण रू. 298.69 कोटीचा प्रस्ताव दिला व फेर प्रस्तावात त्यांनी दर कमी करून प्रकल्प किंमतीच्या 20% अधिक दरावर व त्यावर कंसलटंट फी 5% असा एकुण रू. 286.62 कोटीचा प्रस्ताव दिला होता. यानंतर हा प्रकल्प राबविण्यास्तव उपलब्ध असलेल्या सर्व विकल्पांचा विषय

महानगरपालिकेच्या महासभेसमोर ठेवण्यात आला असता महासभेने ठराव क्र. 201, दि. 20.03. 2018 अन्वये ''केंद्र शासनाचे ''अमृत'' अभियानांतर्गत नागपूर शहरातील अनधिकृत / अधिकृत / स्लम वस्त्यामधे पाणी पुरवठा प्रणालीचे उन्नतीकरण बळकटीकरण करण्याकरिता भारत सरकारचा उपक्रम असलेली वाप्कोस लि. यांना त्यांनी दि. 16.02.2018 रोजी दिलेल्या प्रस्तावानुसार मुळ प्रकल्प राशीच्या (रू. 226.69 कोटी) चे 20% अधिक व या रकमेवर येणाऱ्या राशीवर 5% कन्सलटंसी चार्जेस यानुसार येणारी एकुण रू. 285.62 कोटी किंमतीमधे प्रकल्प राबविण्यात यावा.'' अशी मंजूरी प्रदान केली. सदर प्रस्ताव दि. 27.03.2018 रोजी यथायोग्य निर्णयाकरीता शासनाकडे पाठविला होता. दि. 01.06.2018 रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सुधारीत डि.एस.आर. निर्गमीत झाले. या डि.एस.आर. नुसार सुधारीत प्राकलन तयार करून शासनाकडे प्रशासकीय मान्यतेकरीता पाठविले असता शासनाने रू. 273.78 कोटी रकमेचे सुधारीत किंमतीस दि. 25.06.2018 रोजी शासन निर्णय क्र. अमृत–2016/प्र.क्र. 394(1)/नवि–33, दि. 25.06.2018 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली. मे. वाप्कोस लि. यांना मा. आयुक्त यांचेकडे दि. 29.06.2018 रोजी वाटाघाटीस्तव बोलाविले असता त्यांनी त्यांचे कंन्सलटंसी चार्जेस 5% वरून 3% पर्यंत कमी करण्यास सहमती दिली. वाप्कोस लि. यांनी त्यांचे एजंसी चार्जेस कमी केल्यामुळे हा प्रकल्प ठेव तत्वावर मे. वाप्कोस लि. या भारत सरकारचे उपक्रम असलेल्या एजंसीमार्फत रू. 272.02 कोटी एकूण प्रकल्पीय किंमत अधिक त्यांचे एजंसी चार्जेस 3% असे एकूण रू. 280.18 कोटी रक्कम निर्धारीत करून राबविण्यास महानगरपालिकेला परवानगी देण्यास्तव शासनाकडे दि. 04.07.2018 रोजी मंजुरीसाठी पाठविलेला असुन मंजुरी प्राप्त होणे अभिप्रेत आहे.

सबब हा प्रकल्प केंद्र शासनाचा उपक्रम असलेल्या मे. वाप्कोस लि. कडून त्यांनी दिलेल्या रू. 272.02 कोटी अधिक त्यांचे एजंसी चार्जेस रू. 3% रू. 8.16 कोटी असे एकूण रू. 280.18 कोटी किंमतीवर शासनाचे मंजुरीचे अधिन राहून राबविण्याचा व त्यांचेकडून काम करण्यास्तव यथायोग्य अटी व शर्ती निर्धारीत करून करारनामा करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 170 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर